संजयवार्ता
बुधवार, दि. १० जुलै २०२४
पृष्ठे ४ किंमत ₹ एक www.sanjaywarta.com संपादक : शिवनाथ राठी कार्यकारी संपादक – रामेश्वर राठी सहाय्यक संपाद

# कार्यशाळा:महिलांवरील हिंसा आणि आरोग्य सेवांचा प्रतिसाद ; महिला सुरक्षा हा विकासाचा महत्त्वाचा पैलू

## जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांचे प्रतिपादन

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

आरोग्य कार्यक्रमांद्वारे आम्ही प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहचलो आहोत,या प्रकल्पाद्वारे हिंसाचाराचे महिलांवर होणारे परिणाम कमी करण्यासाठी प्रयास होणार आहेत ही खूप महत्त्वाची बाब आहे. महिलांची सुरक्षा हा विकासाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. प्रत्येक महिलेला घरी, कामाच्या ठिकाणी आणि सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळवण्याचा अधिकार आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी केले.

मासूम (पुणे) आणि सेहत (मुंबई) या संस्थांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व आरोग्य अधिकारी आणि आरोग्य प्रदात्यांची महिलांवरील हिंसा आणि आरोग्य सेवांचा प्रतिसाद' या विषयावर चर्चा हॉटेल लेमन ट्री येथे घडवून आणली. त्या चर्चा सत्राचे आयोजन दि.८ व ९ रोजी करण्यात आले.



उद्घाटन सत्रात उप जिल्हा संचालक छत्रपती संभाजीनगर परिमंडल डॉ. भूषण रामटेके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे, अशा मान्यवरांची उपस्थिती होती.